ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख १० फेब्रुवारी, १९५४ अंक ६

## विविध माहिती

**भारतीय उद्योगधंद्यांना भांडवल**—भारतामधील उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठीं इंटर नॅशनल बँक फॉर डेव्हलपमेंट अँड रीहॅबिलिएशन ही संस्था एखादी बँक काढण्याचा संभव आहे, असें समजतें. संकल्पित बँकेच्या भांडवलापैकीं ४० टक्के भांडवल वरील संस्था पुरवील असा संभव आहे.

**कलकत्त्यांत सिगारेटसवर कर**—प. बंगाल सरकारनें एक वटहुकूम काढून सिगारेटसच्या व्यापाऱ्यांवर नवा कर बसविला आहे. व्यापाऱ्यांच्या धंदेवाईक उलाढालीवर २ टक्के ह्या प्रमाणांत तो आकारण्यांत येत आहे. गेल्या २९ तारखेला संध्याकाळीं एकाएकी हा वटहुकूम काढण्यांत आल्यानें सर्वत्र आश्चर्याचा धक्का बसला. लगेच रात्रीपासून सिगारेटसच्या किंमती एकदम वाढल्या.

**‘आवारा' चित्रपटाला बक्षीस**—राजकपूर ह्या निर्मात्यानें काढलेल्या ‘आवारा’ ह्या बोलपटाला पाकिस्तानच्या बालहित संवर्धक संस्थेनें सुवर्णपदक देण्याचें ठरविलें आहे. चित्रपटाची कथा एका उपेक्षित मुलाच्या भोंवतीं गुंफण्यांत आली असल्यामुळें चित्रपटाला शैक्षणिक मूल्य प्राप्त झालें असल्याचें संस्थेनें नमूद केलें आहे.

**तुंगभद्रेवरील धरणयोजना**—भारताच्या नियोजन समितीनें तुंगभद्रा नदीवरील वीज-उत्पादक धरण योजनेला मंजुरी दिली आहे. संपूर्ण योजनेला १४ कोटी रुपये खर्च येणार आहे. योजना तीन वेगवेगळ्या टप्प्यांनीं पूर्ण करण्यांत येणार असून ती १ लाख किलोवॅट वीज निर्माण करूं शकेल. अमेरिकेकडून मिळणाऱ्या तांत्रिक साह्याच्या कराराप्रमाणें १० लाख, ७६ हजार डॉलर्स किंमतीची यंत्रसामुग्री धरणाकरतां मिळणार आहे.

**लोकभ्रमाचा आर्थिक परिणाम**—म्हैसूर संस्थानामधील जंगलांत नुकतेच पकडलेले हत्ती बाजारांत विक्रीसाठी आणण्यांत आले असतां लोकभ्रमामुळें एका हत्तीची किंमत अवघी १,५०० रुपये आली. ह्या हत्तीला १६ च नखें होतीं. १६ नखी हत्ती लाभत नाहीं अशी समजूत असल्यामुळें तो घेण्यास कोणी तयार होईना. सामान्यपणें हत्तीला १८ नखें असतात. अखेर हा हत्ती एका जर्मन प्राणिशास्त्रज्ञानें विकत घेतला.

**आसाममधील हातमागाचा धंदा**—आसाममधील हातमागाचा बुडूं घातलेला धंदा सावरून धरण्यासाठीं राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारला ६-७ योजना सादर केल्या आहेत. त्या योजना अंमलांत आणण्यासाठी १,४९,५९५ रुपयांचा खर्च करण्याची परवानगी भारतीय सरकारनें दिली आहे. ह्याच कार्यासाठीं १,१७,७५० रुपये कर्जहि मंजूर केलें आहे. ह्या कर्जाला व्याज नाहीं.

**पेप्सु राज्याला कर्ज**—भारतीय सरकारनें पेप्सु राज्य सरकारला १९५३-५४ सालासाठीं ३६ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ही रक्कम पडीक जमिनी लागवडीखालीं आणण्यासाठीं आणि ट्यूब वेल्स खणण्यासाठी खर्च होणार आहे. पंचवार्षिक योजनेप्रमाणें राज्याला देण्यांत येणाऱ्या १ कोटी रुपये कर्जाच्या पोटींच वरील रक्कम देण्यांत आली आहे. कर्ज १५ सारख्या हप्त्यांनीं परत करावयाचें आहे. व्याजाचा दर ४॥ टक्के आहे.

**अफगाणिस्थानला रशियाची मदत**—अफगाणिस्थान आणि रशिआ ह्यांच्यांत परस्पर-मदतीचा एक करार करण्यांत आला आहे. कराराला अनुसरून रशिया १९५४ अखेर अफगाणिस्थानांत दोन मोठीं धान्याचीं कोठारें, एक पिठाची गिरणी आणि एक मोठा पावाचा कारखाना बांधणार आहे. हें सर्व बांधकाम होण्यास ३५ लाख डॉलर्स भांडवल लागेल. भांडवलावर तीन टक्के व्याज घेण्यांत येणार आहे.

**तिबेटमधील पहिली बँक**—प. तिबेटमध्यें प्रथमच एक बँक काढण्यांत आली आहे. प. तिबेटची राजधानी गरटोस येथें ती उघडण्यांत आली असून तिचें नांव ‘एक्सचेंज बँक ऑफ चायना’ असें आहे.

**भारतामधील मोटारींचा धंदा**—भारतामधील अशोक मोटार्स लि. ही कंपनी ब्रिटनमधील रूटस् गटाच्या साह्यानें मोटारी तयार करण्याचा विचार करीत होती; पण हा बेत तडीस जात नसल्याचें समजतें. तथापि लेलंड कंपनीच्या सहकार्यानें ट्रक्स तयार करण्याचा विचार मात्र चालू आहे. मर्सिडीज बेन्स कंपनीच्या मदतीनें मोटार ट्रक्स तयार करण्याचा कारखाना काढण्याची योजना टाटा कंपनी करीत आहे. बेन्स कंपनी जर्मन आहे.

**कोयना धरणाला जागतिक बँकेची मदत?**—पंचवार्षिक योजनेंत समावेश करण्यांत आलेल्या कोयना धरण-योजनेच्या पहिल्या अवस्थेचा सर्व खर्च जागतिक बँकेकडून मिळणार आहे, अशी वार्ता आहे. ह्या कामासाठीं ३३ कोटी रुपये खर्च येणार आहे. जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनीं धरणाच्या जागेची नुकतीच पहाणी केली आहे.

**अधिक धान्य पिकविण्यासाठी मदत**— १९५४-५५ सालांत भारतीय सरकारनें हैदराबाद सरकारला अधिक धान्य पिकविण्याच्या योजनांसाठी १८.४५ लाख रुपये मंजूर केले आहेत, असें समजतें. ह्याशिवाय कांहीं छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामासाठीहि मदत देण्यांत येणार आहे.

## श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना दीर्घायुष्य व चिर आरोग्य लाभो!

नासिक, ता. ३१ जानेवारी, १९५४

मानननीय श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए.
दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४.

यांना आदरपूर्वक नमस्कार. वि. वि:—

ता. २७-१-१९५४ च्या 'अर्थ' पान २९ वर "विक्रय-विद्या व चढाईची स्वदेशी" या शीर्षकाखालीं विक्रयविद्यारत्न श्री. द. ब. बर्वे यांच्या भाषणांतील आपण प्रसिद्ध केलेल्या उतार्‍यांत पुढील उतारा आहे:—

"गेल्या ४० वर्षांत स्वदेशीकरितां धडपड करून जे अनेक आपत्तींशी झगडतां झगडतां इहलोक सोडून गेले त्यांचीं उदाहरणें नमुन्यादाखल मी देतों—लोकहितवादी गोपाळराव देशमुख ...... ह. क. गोखले, लक्ष्मणराव किर्लोस्कर, धुंडीराज फाळके, वगैरे."

वरील उदाहरणें व यादी दिवंगत व्यक्तींची असल्यानें त्या यादींत श्रीयुत लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा नामनिर्देश चुकीचा आहे. श्रीयुत लक्ष्मणराव किर्लोस्कर हयात असून गेल्या पन्नास वर्षांप्रमाणें स्वातंत्र्योत्तरीय महत्त्वाच्या कालांत उद्योगधंद्याचें क्षेत्रांत त्यांच्या बहुमोल प्रयत्नांची व मार्गदर्शनाची भारतास अत्यंत जरूर आहे व अशी मदत भारतास मिळो व त्याकरितां त्यांना दीर्घायुष्य व चिर आरोग्य लाभो, अशी स्वतंत्र भारतांतील प्रत्येक नागरिकाची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. ही सदिच्छा आपल्या "अर्था"चे पुढील अंकांत व्यक्त करावी अशी आपणांस नम्र विनंति आहे.

आपली नम्र
सुनंदा काळे

१३७० पी. काळे यांचा बंगला,
शिवाजी रोड, नाशिक.

---

## कण आणि क्षण

### (सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक-प्रकाशक:—श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ' दुर्गाधिवास, पुणें ४. किंमत २॥ रु.

क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्।
क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम्॥

क्षणाक्षणानें वाढत जाणाऱ्या आयुष्यांत यशाची साधना ही कणाकणानें करायची असते. कौटुंबिक किंवा सामाजिक जीवन यशस्वीरित्या चालवावयाचें असलें तर प्रत्येक व्यक्तीनें पुढें आलेल्या क्षणाचा योग्य उपयोग आणि हातीं आलेल्या कणाचा योग्य विनियोग करूनच आपली जीवित–यात्रा चालविली पाहिजे. 'सुखी जीवनाची पाऊलवाट' म्हणतात ती हीच; आपल्याबरोबर सगळ्याच सख्या–सोयऱ्यांचें आणि पर्यायानें समाजाचें सुख साधण्याचा मार्ग म्हणतात तो हाच! तसें पाहिलें तर सुख साधण्याचा हव्यास हा प्रत्येक व्यक्तीला लागलेलाच असतो. आपापल्यापरीनें जो तो 'सुखाच्या शोधार्थ' निघालेला असतो. पण जागा चुकून भलत्या ठिकाणींच शोध चालविल्यामुळें फारच थोड्यांच्या हातीं सुखाचे कण व यशाचे क्षण येतात. आपल्या सभोंवतीं जर आपण पाहिलें तर दुःखी–कष्टी मनानेंच जीवन जगणारे फार आढळतात. आपलें कोठें चुकतें तेंच त्यांना कळत नाहीं; आपल्यांत काय दोष आहेत तेंच त्यांना समजत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें झालें तर सुखाची पाऊलवाट त्यांना माहीत झालेली नसते, हेंच त्याचें कारण होय.

नव्या पिढींतील तरुण संसारिकांना, गृहस्थाश्रमांत बिचकत बिचकत पाऊल टाकणाऱ्या अननुभवी गृहस्थांना सुखी जीवनाच्या पाऊलवाटांचें दर्शन आजच्या काळांत कोणीतरी घडवायला पाहिजे होतें. नवयुगांतील वाढत्या जबाबदाऱ्या आणि गुंतागुंतींच्या समस्या यांनीं बावचळून गेलेल्या तरुण संसारिकांना यशस्वी रीतीनें जीवन व्यतीत करण्याचा मार्ग कोणीतरी दाखवायला पाहिजे होता. नव्या शक्तीचें, नव्या विचाराचें आणि अद्यावत् अशा स्वरूपाचें मार्गदर्शक पुस्तक संसारिकांसाठी आज हवेंच होतें. श्रीयुत काळे यांनीं ही गरज ओळखून 'कण आणि क्षण' हें अत्यंत उपयुक्त असें पुस्तक लिहून प्रकाशित केलें. नव्या जगाच्या नव्या संसारांत कसें वागावें व कसें वागूं नये या विषयींचें 'कण आणि क्षण' हें एक अत्यंत उद्बोधक असें 'गाईड' (घाटे) श्रीयुत काळे यांनीं तरुण मंडळींच्या हातीं दिलें आहे. मराठीला कमी परिचयाचा असलेला हा वाङ्मयप्रकार लेखकानें हाताळला त्यावरूनच त्याच्या अंतःकरणांतील तळमळ–कळकळ दिसून येते. अंतरीच्या या जिव्हाळ्यामुळें हें पुस्तक अत्यंत सोपें, मनोरंजक, वाचनीय व उद्बोधक झालेलें आहे. पुस्तकांत आलेल्या कांहीं प्रकरणांचे केवळ मथळेच आपण पाहिले तरी देखील पुस्तकाची उपयुक्तता चटकन् डोळ्यांत भरते. 'पाहुणचाराचें व्यावहारिक अर्थशास्त्र' या प्रकरणामधून केलेल्या उपयुक्त सूचनांची अंमलबजावणी केल्यास, आपली कौटुंबिक रहाणी तपासण्यासाठी दिलेल्या प्रश्नांच्या यादींतील दरएक प्रश्नाचें प्रामाणिकपणानें उत्तर देऊन त्याप्रमाणें दैनंदिन कार्यक्रमांत योग्य ती सुधारणा घडवून आणल्यास, व्यक्तिजीवनांत सुखाची भर हमखास पडेल. 'कण आणि क्षण' यांतील उपदेश हा एका अनुभवी अधिकारी व्यक्तीनें मित्रत्वाच्या भूमिकेवरून केलेला असल्यामुळें त्यांत एक प्रकारचा जिव्हाळा व गोडवा निर्माण झालेला आहे. मध्यमवर्गीय संसारिकांकडून कळत–नकळत होणाऱ्या चुकांचें आणि दोषांचें दर्शन मोकळ्या मनानें घडविलेलें आहे. त्या दोषांचें दूरीकरण करण्याचे मार्गहि सर्वांच्या आटोक्यांत येतील असे सोपे व सोईचे सांगितले आहेत. बऱ्याच लोकांना उपदेश हा ऐकण्यास बरा वाटतो; पण तो आचरणांत आणण्याचें काम प्रयासाचें होऊन बसतें. परंतु 'कण आणि क्षण' यांतील उपदेशाच्या गोष्टी कोणाहि व्यक्तीस प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखवितां येण्यासारख्याच आहेत. सहानुभूतीच्या ओलाव्यानें 'कण आणि क्षण'मधील उपदेशाला मनोरंजकता प्राप्त झाली आहे. त्यामुळें हें पुस्तक जाणत्या व नेणत्या व्यक्तींकडून आवडीनें वाचलें जाईल असें भविष्य वर्तवितांना मन कचरत नाहीं.

स्त्रीपुरुषांना सारखेंच मार्गदर्शक ठरेल असें उपयुक्त पुस्तक लिहून प्रकाशित केल्याबद्दल श्रीयुत काळे यांना द्यावे तितके धन्यवाद थोडेच आहेत. पुस्तकाची किंमत मध्यमवर्गीय वाचकांच्या आटोक्यांतील असल्यामुळें त्याचा प्रसार बहुजन-समाजांत होऊन सामाजिक जीवनांतहि एक प्रकारच्या मौलिक सुखाची भर पडेल. श्रीयुत काळे यांनीं अशा प्रकारचीं आणखी पुस्तकें लिहून आजच्या तरुण पिढीला मार्गदर्शन करून उपकृत करावें.

—सौ. उज्ज्वला देसाई,
बी. ए. (ऑनर्स); बी. टी., पुणें.
(भगिनी, जानेवारी १९५४)

# अर्थ

बुधवार, ता. १० फेब्रुवारी, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटिश उद्योगधंद्यांपुढील पेंचप्रसंग

ब्रिटनच्या उद्योगधंद्यांना जगाच्या बाजारपेठांतून तीव्र स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे आणि नेमक्या ह्याच वेळेला संपासारख्या वावटळींनीं औद्योगिक क्षेत्रांत अस्वस्थता माजवली आहे. जीं औद्योगिक भांडणें सुटणें अशक्य झालेलें आहे तीं सोडविण्याकरतां लवादासारख्या अनेक तरतुदी ब्रिटिश कायद्यांत उपलब्ध आहेत. परंतु ह्या तरतूदींचा सध्यांच्या संपाच्या वावटळींत फारसा उपयोग होत नाहीं असें दिसून येऊं लागलें आहे. गेल्या वर्षाच्या सप्टेंबरपर्यंत सुमारें ५० लाख ब्रिटिश कामगारांनीं अधिक वेतन मिळण्यासाठी अर्ज केले होते. ह्या कामगारांत गोद्यांतील मजूर, रेल्वे–कामगार, एंजिनिअर्स, शिक्षक आणि बस-कामगार इत्यादि सर्व तऱ्हेचे लोक होते. ब्रिटनमधील रहाणीचा खर्च वाढलेला असल्यामुळें अशा प्रकारच्या मागण्या न्याय्य स्वरूपाच्या आहेत असेंच मत बहुतेक लोकांनीं व्यक्त केलें आहे. अशा परिस्थितींत सरकार मात्र ह्या प्रकरणीं लक्ष घालण्यास तयार दिसत नाहीं. सरकारच्या ह्या वृत्तीबद्दल सरकारी नोकरसुद्धां टीका करूं लागले आहेत. ह्या टीकाकारांचें म्हणणें असें आहे कीं ब्रिटनच्या गंभीर आर्थिक परिस्थितीविषयीं कामगारांची आणि जनतेची योग्य ती समजूत घालण्याचा प्रयत्न नीटसा करण्यांत आलेला नाहीं. उत्पादनांत वाढ झाल्याशिवाय अधिक वेतन देण्यामुळें किती अनिष्ट परिणाम घडून येतील ह्याची कल्पना ब्रिटिश जनतेस करून देणें अशक्य आहे. ब्रिटनच्या आर्थिक भवितव्यतेचा राष्ट्रीय दृष्टीनें विचार करण्याची वृत्ति फक्त कामगार–संघटनाच तेवढ्या दाखवीत नाहींत, असें नाहीं; ब्रिटनमधील कारखानदारहि ‘ जशास तसें ’ ह्या वृत्तीनें वागून टाळेबंदीचें धोरण स्वीकारीत आहेत.

ब्रिटनच्या फडणिशी खात्यानें नुकतेच कांहीं आकडे प्रसिद्ध केले आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं, १९४५ पासून नोव्हेंबर १९५३ पर्यंतच्या काळांत ब्रिटनमध्यें वस्तूंच्या किरकोळ किंमतींत ४९ टक्के वाढ झालेली आहे. १९४५ सालीं पौंडाची खरेदीशक्ति १०० होती असें धरलें तर ती आज ६७ च राहिली आहे. सरकारतर्फें प्रसिद्ध होणारे आंकडे विश्वसनीय असले तरी ते खऱ्या आर्थिक परिस्थितीवर पुरेसा प्रकाश पाडीत नाहींत. कामगारांच्या लढाऊ धोरणाला तसेंच कारण आहे. ब्रिटनमध्यें टोरी सरकार अधिकारावर आल्यापासून कंपन्यांचे नफे भरमसाठ वाढलेले आहेत. गेल्या वर्षीं तर नफ्यांनीं उच्चांकच गांठला आहे. पण पुढील वर्ष ( १९५४ ) त्याहीपेक्षां अधिक चांगलें जाईल असा विश्वास कंपन्यांच्या वार्षिक अहवालांत व्यक्त करण्यांत येत आहे. कंपन्यांना जे नफे झाले आहेत, त्यासंबंधी मालकांचें म्हणणें असें आहे कीं, कामगारांना भासतात तितके ते मोठ्या प्रमाणावर नाहींत. चलनवृद्धीमुळें कामगारांचे पगार जसे फुगलेले दिसतात तसेच कंपन्यांचे नफेहि वाढलेले दिसतात. हा सर्वच वाद बराच गुंतागुंतीचा असला तरी एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे. वेतनें आणि किंमती ह्यांना एका पातळीवर स्थिर केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाहीं. नुसत्या वेतनवृद्धीनें तर तो मुळींच सुटणार नाहीं. उद्योगधंद्यांत अराजकता माजूं नये म्हणून कारखानदार अधिक वेतन देण्यास तयार होतात. पण लगेच आपल्या मालाच्या व सुखसोयींच्या किंमती वाढवून ते भरपाई करूं पहातात. त्याचा परिणाम असा होतो कीं, ब्रिटिश कारखानदारांनीं भरलेलीं टेंडर्स परदेशाहून परत येऊं लागतात. ब्रिटिश कारखानदारांच्या किंमती न परवडल्यामुळें जर्मन आणि जपानी कारखाने अधिकाधिक कामें मिळवूं लागले आहेत. खुद्द ब्रिटनमधील सामान्य माणसाला मात्र ह्याची जाणीव दिसत नाहीं. कारण सध्यां तरी ब्रिटिश बाजारपेठेंत भरपूर माल, उधारी आणि वाढता नफा ह्यांचें राज्य आहे. पण केव्हां तरी हा बुडबुडा एकदम फुटण्याचा धोका आहे.

---

## हत्तींच्या बाजारांतहि मंदीची झळ

म्हैसूर राज्यांत जंगलांतील हत्ती पकडून ते विकण्याचा धंदा चालतो. परंतु सध्यां हत्ती घेण्यास फारशीं गिऱ्हाइकें भेटत नसल्यानें ह्या बाजारांतहि मंदी आली आहे. राज्यांतील कारापूर जवळच्या दाट जंगलांत हत्तींचें वास्तव्य असतें. हत्ती पकडण्याच्या मोहिमेला ‘ खेडा ’ असे म्हणतात. अशाच मोहिमेंत नुकतेंच निरनिराळया वयाचे आणि आकाराचे ७७ हत्ती पकडण्यांत आले. हत्तींच्या किंमती बऱ्याच घसरल्या आहेत. साधारणपणें जुन्या आडगिऱ्हाइकी छोट्या मोटार गाड्यांना जितकी किंमत येते तितक्याच किंमती विकल्या गेलेल्या हत्तींना मिळाल्या. भारतामधील संस्थानें विलीन झाल्यामुळें हत्तींना पाळण्यास कोणी तयार होत नाहीं असें दिसून आलें. सगळयांत मोठ्या हत्तीची उंची ९ फूट, ३ इंच होती. एका वर्षाच्या वयाचे लहान हत्ती साधारणपणें गाई एवढे असतात. एक हत्तीण आणि पांच वयस्कर हत्तीहि पकडण्यांत आले होते. पण त्यांचा कसलाच उपयोग होण्यासारखा नसल्यानें ते सर्व जंगलांत परत सोडून देण्यांत आले. फक्त ४३ हत्तींचा लिलांव करण्यांत आला. अवघ्या ११ हत्तींना मागणी आली. त्या सर्वांची मिळून २२,००० रुपये किंमत झाली. एका हत्तीला जास्तींत जास्त ६,००० रुपये किंमत आली. म्हैसूर सरकारचें जंगलखातें हत्तींना ‘ जंगलांतील माल ’ ह्या सदरांत घालतें आणि त्यांच्या विक्रीवर विक्रीकर वसूल करतें. एका रुपायामागें ३ पैसे ह्या दरानें विक्रीकर वसूल करण्यांत येतो. संस्थानी राजवटींचें वैभव म्हणून हत्ती पाळण्याची प्रथा आतां संपली आहे हें खरें. पण द. भारतामधील मोठमोठ्या प्राचीन देवळांतून अजूनहि हत्ती पाळण्यांत येतात व उत्सवप्रसंगीं मिरविण्यांत येतात.

---

**भारतासाठी नवीं कॉमेट विमानें**—एअर इंडिआ इंटर नॅशनल विमान वाहतूक कंपनीनें दोन कॉमेट विमानें विकत घेण्याचें ठरविलें आहे. बी. ओ. ए. सी. कंपनी अशा प्रकारचीं ५ विमानें बांधण्यास लवकरच सुरुवात करणार आहे. जगाला प्रदक्षिणा घालणाऱ्या दोन विमानमार्गांवर कंपनी ह्या जातीचीं विमानें वापरणार आहे.

## बँका, नोकर आणि क्रिकेट

पुण्यांतील बँकां—बँकांतील पुरोहित ढालीसाठी क्रिकेटचे सामने नुकतेच पार पडले. ह्या सामन्यांत नऊ बँकांनीं भाग घेतला होता. गेल्या वर्षी सुरू केलेल्या उपक्रमानें चालू वर्षी चांगलीच प्रगति केली आणि सामन्यांना रंगहि चांगला चढून खेळाडूंच्या उत्साहांतहि वाढ झाली, असें दिसून येतें. पूना बँकिंग असोसिएशनकडे सामन्यांची व्यवस्था आतां आलेली आहे.

खेळांचें महत्त्व नव्यानें वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. कामें व कटकटी ह्यांतून डोकें वर काढण्यास आणि मनाचा ताजेपणा कायम ठेवण्यास खेळांचा फार चांगला उपयोग होतो. हितावह स्पर्धेमुळें खेळांचें आकर्षण वाढतें आणि खेळ खेळणारे व पहाणारे ह्या दोघांचीहि सात्त्विक करमणूक होते; शारीरिक आरोग्य रहाण्यासहि त्यामुळें मदत होते. खेळांचे हे उपयोग सुपरिचित आहेत. खेळांमुळें लोकांचा स्वाभिमान जागृत होऊन तो टिकण्यास मदत होते आणि कोणत्या तरी क्षेत्रांत कां होईना, आपण इतरांच्यापेक्षा श्रेष्ठ आहोंत, ह्या जाणीवेमुळें मनुष्याला शांतता व समाधान ह्यांची प्राप्ति होते. मॅनेजर हा नोकरींच्या जागीं श्रेष्ठ असला, तरी क्रिकेट—मैदानावर ज्यास्त धावा काढणाऱ्या लेजरकीपरवर टाळ्यांचा वर्षाव होतो; उत्कृष्ट गोलंदाज किंवा फलंदाज ह्यांचे फोटो छापून येतात; नोकरीचें गौणत्व तेथें आड येत नाहीं. बँकेच्या चेअरमनचा फोटो छापून येतो, त्यापेक्षा खेळाडूचा छापून येणारा फोटो अधिक उत्साहवर्धक ठरतो. पूना क्लबच्या मैदानावर पाऊलहि टाकतां येणें अशक्य असणारा बँक कारकून तेथील हिरवळीवर ऐटीनें खेळूं शकतो व तेथील भव्य इमारतींत स्वाभिमानानें वावरूं शकतो; स्वतःच्या बँकेंत त्याला कोणीहि विचारलें नाहीं तरी त्याचें दुःख तो त्यामुळें सहन करण्यास समर्थ होतो. केवळ चार वर्षे आधीं जन्मला, म्हणून साहेब बनलेल्याला किंवा वशिल्यामुळें अधिकारी झालेल्याला आर्थिक लाभ होत असला, तरी खेळाडूला वाटणारा आनंद हा कांहीं औरच असतो. क्रिकेटच्या मैदानावर बॅटिंगला उतरल्यावर लायकी खेरीज दुसऱ्या कशासच वाव उरत नाहीं आणि संघामध्यें वशिल्याचें एखादें तट्टु शिरलें, तरी त्याची फजिती झाल्याविना रहात नाहीं. क्रिकेटसारख्या खेळामुळें बँकांच्या नोकरवर्गास माणूस म्हणून अधिक स्वाभिमानपूर्वक जगण्यास साहाय्य होतें, ह्यादृष्टीनें पुरोहित ढालीच्या सामन्यांचें आम्हीं स्वागत करतों, आणि बँक नोकरांनीं खेळांचा भरपूर फायदा घ्यावा असें सुचवितों. खेळांत प्राविण्य दाखविणारांना बँकांनीं वाव व उत्तेजन देऊन, महाराष्ट्रांतच प्रवीण महाराष्ट्रीय खेळाडूंचा योगक्षेम चालण्यास मदत करावी; म्हणजे महाराष्ट्रीयांचें खेळाच्या क्षेत्रांत पुढें पाऊल पडल्याविना रहाणार नाहीं. बँकेंतील नोकरानें बँकेंत मनोभावें काम केल्यानंतरहि त्याच्या फावल्या वेळांतसुद्धां त्यानें खालीं मान घालूनच चालले पाहिजे, अशी कांहीं बँकअधिकाऱ्यांची वृत्ति असल्यास ती बदलली पाहिजे. त्याबरोबरच, रविवारीं क्रिकेटच्या सामन्यांत चौकार आणि षटकार मारणाऱ्या फलंदाजानें सोमवारीं सकाळीं बँकेंतील त्याचें काम कसोशीनें पार पाडलें पाहिजे, हें उघड आहे. तरच, खेळांचा व सामन्यांचा खरा उपयोग होईल.

## प्रदर्शनांच्या चळवळीस प्रोत्साहन

आज आम्ही याच अंकांत दुसरीकडे पुणें बृहन्नगरपालिकेस लिहिलेलें अनावृत्त पत्र छापिलें आहे. या निवेदनास आमचा संपूर्ण पाठिंबा असून आम्ही त्याचा पुरस्कार करीत आहोंत. या पत्राचा विषय पुणें शहरांत प्रदर्शनांची चळवळ सुरू व्हावी असा आहे व या चळवळीस पुणें महानगरपालिकेनें सर्वस्वीं सहाय्यभूत व्हावें अशी आमची शिफारस आहे. या अनावृत्त पत्रावर श्री. व्ही. एस. भिडे आय. सी. एस., प्रो. जी. बी. जठार आय. ई. एस., श्री. ए. डी. घोपेश्वरकर, श्री. जस्टिस म. वि. भिडे आय. सी. एस., सर र. पु. परांजपे, श्री. ज. स. करंदीकर, श्री. आर. पी. पटवर्धन, श्री. जयवंतराव टिळक, इत्यादि पुणें शहराच्या थोर नागरिकांच्या सह्या आहेत. या कामीं या शहरांतील शिक्षण संस्था, व्यापारी संस्था, मराठा चेंबर व सार्वजनिक कार्यकर्ते यांनीं लक्ष घालून आपलीं मतें या मागणीच्या पुष्ट्यर्थ नगरपालिकेस कळवावीं. हा प्रश्न केवळ स्थानिक नसून, पुणें हें महाराष्ट्रांतील चळवळींचें उगमस्थान असल्यामुळें तो प्रश्न महाराष्ट्राच्याहि जिव्हाळ्याचा आहे. ज्या जागेची मागणी आज या पत्रांत अभिप्रेत आहे ती जागा प्रदर्शनांच्या सोयीची आहे. ती म्हणजे पुण्यांतील शिवाजीनगर मार्केट ही होय. तिचा काय उपयोग करावा याचा विचार कॉर्पोरेशन करीत आहे. अशा वेळीं हें पत्र अगदीं वेळेवर प्रसिद्ध होत आहे व त्याचा पुरस्कार महानगरपालिकेचे सभासद करतील अशी आम्हांस मोठी उमेद आहे.

---

### " ग्रामीण भागांतील बँकनोकरांना पगारवाढ नको "

ग्रामीण भागांतील (३०,००० खालील लोकवस्तीच्या ठिकाणीं) बँकनोकरांच्या सध्यांच्या वेतनश्रेणींत वाढ केली जाऊं नये, असा अर्ज भारत सरकारतर्फे लेबर अपेलेट ट्रायब्यूनलकडे करण्यांत आला आहे. ग्रामीण भागांत बँकिंगची वाढ करण्यांत यावी, ह्या दृष्टीनें रूरल बँकिंग इन्कायरी कमिटीनें केलेल्या सूचना ट्रायब्यूनलनें विचारांत घ्याव्या असें सरकारचें म्हणणें आहे. सध्यां अस्तित्वांत असलेल्या कचेऱ्यांना दोन वर्षे व नवीन निघणाऱ्या कचेऱ्यांना चार वर्षे शास्त्री अवार्ड लागू होऊं नये, अशी बँकिंगच्या प्रसाराच्या दृष्टीनें भारत सरकारची ट्रायब्यूनलकडे मागणी आहे. वृत्तपत्रांतून जाहिराती देऊन हा नवा विषय जाहीर केला जाईल व बँकनोकरांना त्यांचें म्हणणें मांडण्यास संधि दिली जाईल.

---

### मध्यभारतासाठी केंद्रीय सहकारी बँक

मध्यभारत स्टेट को. बँक लि. चें उद्घाटन ग्वाल्हेर येथें १९ फेब्रुवारी रोजीं श्री. गुलझारीलाल नंदा, मध्यवर्ती सरकारचे योजनामंत्री, ह्यांच्या हस्तें होणार आहे. ह्या केंद्रीय बँकेच्या बोर्डावर ५ अधिकारी व १० बिगर—अधिकारी डायरेक्टर काम करतील. पहिलीं दोन वर्षे दरसाल ५०,००० रु. व पुढें तीन वर्षे दरसाल २५,००० रु. सबसिडी सरकार बँकेला देणार आहे.

---

### नऊ महिन्यांत २७७ कोटी रु. उत्पन्न

इन्कमटॅक्स, कस्टम्स व एक्साइजचें चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतील उत्पन्न २७७ कोटी रु. झालें. सबंद वर्षांत मिळून तें ४२१ कोटी रु. होईल, असा मूळ अंदाज आहे. १९५२–५३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ३०१ कोटी रु. उत्पन्न झालें होतें व त्या सबंद वर्षाच्या एकूण उत्पन्नाचा मूळ अंदाज ४२७ कोटी रु. होता.

**बृहन्नगरपालिकेस अनावृत पत्र**

# प्रदर्शनांच्या चळवळीस प्रोत्साहन द्या

ज्याप्रमाणें मोठ्या बागा, शिक्षण-संस्था, इ. लोकशिक्षणोपयोगी सार्वजनिक कार्यें पुण्याच्या बृहन्नगरपालिकेनें चालविलीं आहेत, त्याचप्रमाणें प्रदर्शनांची वसाहत निर्माण करून शिवाजीनगर-बाजार, या इमारतींचा उपयोग स्वदेशी, उद्योगधंदे, शास्त्रांचा प्रचार, इ. कामांचेसाठीं करावा व एका नवीन उपक्रमाचा प्रारंभ करावा.

पुणें शहरांत संस्मरणीय असें प्रदर्शन १८८८ सालीं हिराबागेंत भरलें. १८५१ सालीं जागतिक कीर्तीचें आंतरराष्ट्रीय, जगांतील सर्व देशांच्या सर्व उद्योगधंद्यांचें व कलांचें प्रदर्शन लंडन येथें भरलें व फार मोठ्या प्रदर्शनांचा प्रारंभ त्यापासून झाला. या प्रदर्शनाच्या अनुरोधानें ठिकठिकाणीं जगांत सर्वत्र मोठमोठीं प्रदर्शनें भरलीं. लंडनच्या प्रदर्शनाचें अनुकरण १८८२-८३ सालीं कलकत्ता येथें एका फ्रेंच तज्ज्ञानें केलें. त्या प्रदर्शनाची छाननी गणेश व्यंकटेश जोशी यांनीं केली—एक लेख लिहिला. नामजोशी यांनीं त्याचा अभ्यास केला व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या नमुन्यावरून आंतरप्रांतीय खऱ्या अखिल भारतीय प्रदर्शनाची आंखणी व उभारणी पुणें शहरांत केली. रु. १०,००० चा फंड उभा केला. प्रदर्शनानंतर १०,००० वस्तु व रु. १०,००० शिल्लक राहिलें. १८५१ च्या लंडन येथील प्रदर्शनांतून बराच फायदा झाला. त्यांतून आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या १४ राष्ट्रीय संस्था इंग्लंडमध्यें स्थापन झाल्या. साउथ केन्सिंग्टन येथें प्रदर्शनांची व संग्रहालयांची वसाहत निर्माण झाली. पुणें येथील हिराबागेंतील प्रदर्शनांच्या चळवळींतून सध्यांचा महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय उगम पावला व हंगामी प्रदर्शनांतून चिरंतन संस्था निर्माण झाली. १८८८ सालानंतर हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं प्रदर्शनें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर भरूं लागलीं. पुण्यानें उदाहरण घालून दिलें व त्याचें अनुकरण इतरत्र झालें. म्हैसूर येथें दसरा-प्रदर्शन १८८८ पासूनच प्रतिवर्षीं भरूं लागलें. त्या प्रदर्शनास म्हैसूर संस्थानाचा मोठा व सतत मिळणारा आश्रय होता. तसेंच संस्थानच्या आश्रयानें ग्वाल्हेर येथेंहि कित्येक वर्षें गुरांचा बाजार व मोठें नियतकालिक प्रदर्शन भरत असतें. १८८८ सालीं प्रदर्शनांची चळवळ पुण्यानें पुढाकार घेऊन सुरू केली व तिचें अनुकरण अनेक ठिकाणीं झालें. कलकत्ता, मुंबई, मद्रास व कराची या नामवंत बंदरांचे ठिकाणीं मोठमोठीं प्रदर्शनें झालीं. काश्मिरांत प्रतिवर्षीं प्रदर्शन भरत असतें. पुढें काँग्रेस अधिवेशनास जोडून प्रदर्शनें भरविण्याचा प्रघात पडला. पुढें केवळ खादीच्या प्रदर्शनांनीं आघाडी मारली. १९२९ सालीं लाहोर येथें मोठें प्रदर्शन भरलें. हें प्रदर्शन काँग्रेसच्या अधिवेशनास जोडून भरविलें होतें. त्यापूर्वी कानपूर येथें एक फार मोठें प्रदर्शन भरलें होतें. त्यांत प्रांतिक सरकारनें संपूर्ण सहाकार्य दिलें होतें व उत्तर हिंदुस्थानांतील सर्व कलांचें प्रदर्शन व कृति त्यांत मांडल्या होत्या. मध्यंतरीं सन १९२५-२६ पासून सरकारनें शेतीचीं प्रदर्शनें भरविण्याचा प्रारंभ केला व पुण्यांत सर्वांत मोठें प्रदर्शन भरलें. त्यांतून "प्रेसिडेन्सी ॲग्रिकल्चरल शो-फंड" स्थापन झाला. नंतर त्याच पद्धतीनें अहमदाबाद, बेळगांव, हुबळी, येथें शेतीचीं प्रदर्शनें भरलीं. या देशावर १८५१ च्या लंडनच्या प्रदर्शनापासून प्रदर्शनाची लाट आली व ती सर्व देशभर पसरली. १९२४ सालच्या वेम्ब्ले प्रदर्शनानें ती पुन्हां ताजीतवानी केली. १८८२-८३ सालीं हिंदुस्थान सरकारनें एत्तद्देशीय कलाकौशल्यांच्या समृद्धीसाठीं एक विस्तृत योजना आंखली. सर्व देशाची पाहणी झाली व "इंडिअन् आर्ट" या विषयावर एका संस्थेनें १४ वर्षें एक नियतकालिक चालविलें व त्यांत हिंदुस्थानांतील सर्व कलांचा सर्व इतिहास सचित्र व भरपूर वर्णनासह इंग्लंडमध्यें छापला गेला. हें नियतकालिक "एन्सायक्लोपीडिया" सारखें मोठें आहे व या ग्रंथसंग्रहास आज रु. ३,००० ते रु. ५,००० किंमत पडते. या योजनेंतून हिंदी कलाकौशल्याची कायम स्वरूपाची व्यापार-अभिवृध्यर्थ प्रांतानिहाय व्यापारसंवर्धनगृहें स्थापन झालीं. लखनौ येथील एम्पोरियम्, मद्रास येथील "टेक्निकल इन्स्टिट्यूट", लाहोर येथील मेयो स्कूल ऑफ आर्ट" हीं त्यांतूनच निघालीं. मुंबईतांहि आर्ट स्कूल स्थापन झालें. कांहीं प्रांतांत सरकारनें पुढाकार घेऊन आंतरप्रांतीय प्रदर्शनें भरविलीं. कराची व लाहोर येथें सरकारनें मोठमोठीं प्रदर्शनें भरविलीं. पुणें शहरांत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पुरस्कारानें १९२२ ते १९२९ पर्यंत गणेशोत्सवांत प्रतिवर्षीं भाऊमहाराज बागेंत ८-९ प्रदर्शनें भरविलीं. या प्रदर्शनांचा लौकिक देशभर पसरला.

पुढें महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचें पुनरुज्जीवन झालें. सरकारनें विश्रामबाग-वाडा सवलतीनें एक लाख रुपयांस पुणें नगरपालिकेस संग्रहालयाच्या पुनरुज्जीवनास मदत म्हणून दिला. आणि प्रदर्शनांच्या चळवळीचा पुन्हां आरंभ संग्रहालय संस्थेनें केला. संग्रहालयानें १९३३, १९३५, १९३७ व १९३९ या सालीं चार मोठीं प्रदर्शनें भरविलीं. प्रत्येक प्रदर्शनानें १५-२० एकर जागा व्यापिली होती. या प्रत्येक प्रदर्शनास पुणें नगरपालिकेनें जागा व आर्थिक साहाय देऊन मदत केली. सरकारकडूनहि खात्याचे मार्फत मदत मिळाली होती व हीं प्रदर्शनें मोठीं यशस्वी ठरलीं व त्यांनीं संस्थेच्या लौकिकांत भर घातली व पुणें शहराचाहि लौकिक वाढविला. प्रदर्शन हें लोकजागृतीचें बलवत्तर साधन आहे ही कल्पना दृढमूल झाली व या साधनाचा अंगिकार अनेकांनीं केला. प्रांतिक सरकारांनीं केला व आज मध्यवर्ति सरकार तर दिल्लीस वारंवार प्रदर्शनें भरवीत आहे. आगगाडी, तारखातें यांचीं शतसांवत्सरिक प्रदर्शनें भरवून प्रदर्शनांच्या चळवळीनें आज देशांत फारच मोठी मजल मारली आहे.

कांहीं अधल्यामधल्या प्रयत्नांनीं प्रदर्शनें अयशस्वी होऊन प्रदर्शनांचे वरील कित्येक ठिकाणच्या लोकांचा विश्वास उडाला. २० वर्षांच्या पूर्वीची प्रदर्शनमांडणी व पद्धति आज निकामी व अयशस्वी ठरली व युद्धकालानंतर लोकांना कांहींतरी नवीन

हर्ब असें वाटूं लागलें. दुकानदारी व प्रसिद्धि यांची सजावट बदलून गेली व तट्टे, बांबू, वासे यांच्या बांधलेल्या प्रदर्शनाच्या दुकानांतून बसण्यास व्यापारी व कारखानदारवर्ग तयार होईनासा झाला.

परदेशपर्यटन जनतेमध्यें वाढलें, व तिकडच्या मोठमोठ्या प्रदर्शनांची पाहणी करून कित्येक लोक आले व त्यांनीं आपल्या बरोबर नवीन मांडणीचें तत्त्वज्ञान इकडे आणिलें, व लोकजागृति अधिक झाली.

१९०८ सालीं स्वदेशी चळवळ सुरू झाली, त्यावेळीं गायकवाडवाड्यांत स्वदेशी वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें. स्वदेशी वस्तूंचा प्रसार व व्यापार हें कित्येक वर्षप्रदर्शनाचें उद्दिष्ट असे.

१९२२ ते १९२९ सालीं भरलेलीं प्रदर्शनें भाऊमहाराजांचे बागेंत स्वदेशी बाजार व औद्योगिक प्रदर्शन या नांवानेंच भरत.

कोठें कोठें प्रदर्शनांत परदेशी माल आल्यास त्यावर बहिष्कारहि पुकारण्यांत येत असे.

१८५१ सालीं जें प्रदर्शन लंडन येथें भरलें त्यांत जगांतील सर्व राष्ट्रांतील सर्व कला व उद्योगधंदे एकत्र जमविण्यांत आले होते. या सर्व कला व सर्व उद्योगधंदे यांचा ब्रिटन देशानें पूर्णपणें अभ्यास केला व १९५१ सालचें १०० वर्षांनीं भरणारें देशव्यापी जागतिक कीर्तीचें प्रदर्शन संपूर्णपणें ब्रिटिश उद्योगानें भरलेलें होतें. अशाप्रकारें १८५१ पासून प्रदर्शनांचा चांगला उपयोग करून अनेक बाबतींत इंग्लंड देश १९५१ सालच्या प्रदर्शनांत स्वावलंबी झालेला दिसून आला.

अशी प्रदर्शनांची चळवळ सर्वत्र सातत्यानें चालविली पाहिजे. त्याला नमुनेदार उदाहरण ब्रिटनचें आहे. तसाच सततोद्योग आम्हीं केला पाहिजे.

प्रदर्शनांच्या चळवळीनें व्यापारधंदा वाढतो, उद्योगव्यवसाय वाढतो व स्थानिक नगरपालिकेचें उत्पन्न वाढतें. या व अशा अनेक गोष्टी संपूर्णपणें ध्यानांत घेऊन कॉर्पोरेशननें एक नवा उद्योग या शहरांत सुरू करावा. शिवाजीनगर मार्केटसारखी जागा प्रदर्शनासाठी बांधणें होणार नाहीं, परंतु ही अशा कामाला सर्वस्वीं उपयुक्त जागा आहे. तेथें युद्धोत्तर कालांतील अर्वाचीन प्रदर्शनांच्या चळवळीची कॉर्पोरेशननें मुहूर्तमेढ रोवावी. प्रचाराप्रमाणें प्रदर्शन हें एक शिक्षणाचें व लोककल्याणकारी जागृतीचें मोठें बलवत्तर साधन आहे. ही जागा महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयासारख्या ख्यातनाम चिरस्थायी संस्थेस मिळाल्यास त्याचें संस्था चीज करील व सरकार सहायभूत होईल व एक नवा व्यवसाय पुण्यांत नांवारूपास चढेल. जगांत सर्व देशांत सर्वत्र प्रदर्शनाची उपयुक्तता पटून रूढ झालेली आहे. युरोप, अमेरिका, आदिकरून देश आपलें कौशल्य, संशोधन व उत्पादन दिल्लीस आणून मांडीत आहेत. रशियानें अलोट साहित्य आणून मुंबईच्या प्रदर्शनांत मांडलें होतें. असा प्रदर्शनांना आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेला आहे. मानवतेच्या हक्काची सार्वभौम सदन हें जगप्रसिद्ध प्रदर्शन युनेस्को संस्थेनें पॅरिस येथें भरविलें. हिंदी कारागिरी आज वॉशिंग्टन्, न्यूयॉर्क, लंडन् येथें मांडण्यांत येत आहे. लंडन् शहर तर प्रदर्शनें, परिषदा व तत्सम चळवळींचें जागतिक केन्द्र बनलें आहे. ऑलिंपिया अर्लस् कोर्ट ११ व १२ एकरांच्या लंडन् येथील प्रदर्शन वसाहतीसाठी बांधिलेल्या इमारती वर्षाचे २८८ दिवस विविध प्रदर्शनांनीं गजबजून गेलेल्या असतात. तरी अशा पद्धतीचा कांहींतरी संघटित प्रयत्न पुण्यासारख्या चळवळींचें उगमस्थान म्हणून कीर्तिमान झालेल्या शहरांत सुरू व्हावा ही गोष्ट उचित व इष्ट आहे.

पुण्यांत एकदां लौकिकास चढलेली चळवळ जागा व इतर सोई यांच्या अभावीं बंद पडल्यासारखी झाली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळेंहि व्यत्यय येऊन तो उद्योग बंद पडला. आज अनायासें शिवाजीनगर-मार्केट ही या कामाला उपयोगी पडण्याजोगी जागा फुकट पडून आहे, ती या कामीं लावावी. या कामीं बृहन्नगरपालिकेनें पुढाकार घ्यावा, व ग्वाल्हेर, म्हैसूरसारखा लौकिक या बाबतींत या शहरास मिळवून द्यावा किंवा ही शिवाजीनगर मार्केटची जागा महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयास द्यावी व त्या संस्थेस ही चळवळ चालवावयास मदत करावी.

र. पु. परांजपे
माजी हायकमिशनर, ऑस्ट्रेलिया.

एम. व्ही. भिडे
आय. सी. एस., माजी हायकोर्ट जज्ज

आर. पी. पटवर्धन
आय. ई. एस. (रि.),
माजी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन

जी. बी. जठार
आय. ई. एस. (रि.)

ज. श्री. टिळक
संपादक केसरी

जगन्नाथ महाराज पंडित
फ. क्ला. सरदार, इनामदार

बा. ग. जगताप
मराठा एज्युकेशन सोसायटी

श्री. ग. वझे
हिंद सेवक समाज

ज. स. करंदीकर
ट्रस्टी, केसरी–मराठा ट्रस्ट

व्ही. एस. भिडे
आय. सी. एस., माजी कमिशनर

वि. वि. सोहोनी
माजी डायरेक्टर जनरल ऑफ ऑबझरवेटरीज

ए. डी. धोपेश्वरकर
बॉ. ए. सर्व्हिस I (रि.)

शंकर नानासाहेब करपे
माजी नगराध्यक्ष

के. ना. शिरोळे
माजी नगराध्यक्ष

शं. रा. कानिटकर
माजी नगराध्यक्ष.

### जागतिक बँकेचा नफा वाढला

" इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट " ला ३१ डिसेंबर, १९५३ अखेर संपलेल्या सहामाहींत १,०१,२२,६४९ डॉलर्स नफा झाला. १९५२ च्या दुसऱ्या सहामाहींत ७३,३९,७४३ डॉलर्स नफा झाला होता. म्हणजे, नफ्यांत सुमारें २५ लक्ष डॉलर्सची वाढ झाली. १९५३ च्या दुसऱ्या सहामाहींत बँकेनें ब्राझील, चिली, कोलंबिया, आइसलंड, इटली, जपान, निकाराग्वे, पनामा, टर्की व दक्षिण आफ्रिका ह्या देशांना १९,०३,९२,००० डॉलर्सची १७ कर्जे मंजूर केलीं. म्हणजे बँकेच्या एकूण कर्जाची रक्कम १,७८,११,५८,४६४ डॉलर्स एवढी झाली. प्रत्यक्ष आदा केलेल्या कर्जाची रक्कम आतां १,२३,६३,०४,७३४ डॉलर्स झाली आहे. झेकोस्लोव्हाकियानें बँकेच्या भांडवलाचे पोटीं देणें असलेली ६,२५,००० डॉलर्स रक्कम दिली नाहीं म्हणून त्या देशाचें सभासदत्व ३१ डिसेंबर, १९५३ रोजीं रद्द करण्यांत आलें.

---

### खेळण्याच्या पत्त्यांचा नवा कारखाना

मुंबई येथील खेळण्याचे पत्ते तयार करणाऱ्या नव्या कारखान्याचें उद्घाटन नुकतेंच झालें. पार्कर अँड सन्स लि. नें हा कारखाना उभारला असून त्यांत २० लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे. उत्कृष्ट दर्जाचे पत्ते ह्या कारखान्यांत लवकरच तयार होऊं लागतील, व त्यांत १०० कामगारांना काम मिळूं शकेल.

---

### ३ कोटि पौंड शिलकी दुधाची भुकटी

अमेरिकन सरकारजवळ उरलेली ३ कोटि पौंड दुधाची भुकटी यूनोच्या बालसाहाय्यक निधीनें ( युनिसेफ ) दर पौंडाला १ सेंट ( सुमारें पाऊण आणा ) या नाममात्र किंमतीनें विकत घेतली आहे. या बाबतींत अमेरिकन सरकारच्या शेती खात्यानें असें सांगितलें कीं, किंमतींना आधार देण्याच्या सरकारी योजनेप्रमाणें तें दूध अमेरिकेंतील शेतकऱ्यांकडून दर पौंडास १६ सेंट या भावानें विकत घेण्यांत आलें होतें. जगभर सदस्य–देशांतील मुलांच्या पोषणासाठीं तें दूध वापरण्यांत येईल.

---

### दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५३ मध्यें २४ लक्ष, ५२ हजार रु. नफा झाला. दर भागास २ रु. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### अमेरिकेंतील बँकरेट उतरला

अमेरिकेंतील पांच प्रमुख फेडरल रिझर्व्ह बँकांनीं आपल्या डिस्कौंटचा दर ता. ४ फेब्रुवारीपासून २% चा १¾% केला आहे. बॉस्टन, न्यूयॉर्क, फिलॅडेल्फिया, सेंट लुइ आणि सॅन फ्रॅन्सिस्को येथील त्या बँका आहेत. ज्या दरानें सभासद बँकांना फेडरल बँका कर्जें देतात, तो डिस्कौंट रेट होय. जानेवारी, १९५२ मध्यें हा दर १¾% वरून २% वर नेण्यांत आला होता, तो आतां पूर्ववत् झाला आहे. व्यापारी बँका व्यापारी व कारखानदार ह्यांना त्यामुळें सढळपणें व कमी व्याजाच्या दरानें कर्जे देऊं शकतील. डिस्कौंट रेट उतरविला, त्याला विशेष कारणें घडलीं आहेत, असें मानूं नये, असा खुलासा फेडरल रिझर्व्ह बोर्डाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानें केला आहे. बँक ऑफ फ्रान्सनें ३ फेब्रुवारी रोजीं डिस्कौंट रेट ३½% चा ३¼% केल्याची बातमी आहे.

---

### सहकारी ट्रेनिंग कॉलेजें

पुणें येथील सहकारी ट्रेनिंग कॉलेजच्या धर्तीवर आणखी तीन कॉलेजें स्थापन करण्यांत यावयाचीं आहेत. एक कलकत्ता येथें, एक उत्तर प्रदेशांत आणि एक मद्रास येथें अशीं कॉलेजें लवकरच अस्तित्वांत येतील. सहकारी चळवळींतील अधिकारीवर्गास सहकारी शिक्षण देणें, हा त्या कॉलेजांचा हेतु आहे. रिझर्व्ह बँक आणि भारत सरकार ह्या दोघांनीं मिळून नेमलेल्या " स्टँडिंग कमिटी फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग "कडे ह्या कॉलेजांची व्यवस्था राहील. प्रो. द. गो. कर्वे ह्या कमिटीचे चेअरमन आहेत. मद्रासमधील कॉलेज सर्वांत आधीं सुरू होईल, असें प्रो. कर्वे ह्यांनीं मद्रास येथें एका मुलाखतींत सांगितलें.



### "ग्लुकोकोला" ट्रेडमार्कला मंजुरी नाहीं

रजिस्ट्रार ऑफ ट्रेडमार्क्सनें " ग्लुकोकोला " हे शब्द असणारी ट्रेडमार्क नोंदण्यास नकार दिला आहे. पार्ले बॉटलिंग कंपनीनें केलेल्या नोंदणी अर्जास अमेरिकन कोका कोला कंपनीनें हरकत घेतली होती. "ग्लुको कोलाचा" उच्चार कोको कोला-सारखाच जवळजवळ होतो, त्यामुळें घोटाळा किंवा फसवेगिरी होण्याचा संभव आहे, असें समर्थन रजिस्ट्रारनें केलें आहे.

### टोकिओ शहरांतील बेकारी

एकट्या टोकियो शहरांतच १८,००,००० लोक बेकार आहेत. टोकिओची नगरपालिका त्यांपैकीं ४०,००० लोकांना रोजंदारीवर काम देऊं शकते. त्यांना दररोज प्रत्येकीं २४० येन ( ३ रु. ) रोजगार मिळतो.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे


" शरद चरक "
वसंत नं. ३ चरक
उसाचे चरक
हंगाम नजीक आला !
—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा—
किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

## आपली दहा रुपयांची नोट

### (१)

आपण एकमेकाला पैसे देतो–घेतो, त्यांत, रक्कम लहान मोठी असेल त्याप्रमाणें, शंभर रुपयांची, दहा रुपयांची, अशा नोटा वापरतो आणि किरकोळ देण्या–घेण्यासाठी रुपये व इतर लहान नाण्यांचा उपयोग करतो. सबंध देशभर पैशाचे हे व्यवहार चालू असतात आणि त्या व्यवहारांच्या मानानें चलनहि खेळत रहातें. ह्या चलनांत रकमेच्या दृष्टीनें विचार केला, तर शंभर आणि दहा रुपयांच्या नोटांचाच भरणा मोठा असतो; लहान नाण्यांची किंमत एकत्र केली तर ती फार भरत नाहीं. सुमारें ११०० कोटी रुपयांच्या अशा चलनी नोटा सध्यां हातो-हात फिरत आहेत किंवा तिजोऱ्यांत पडून आहेत. जरूरीपेक्षा चलन वाढलें म्हणजे चलनी नोटा लोकांच्या हातांतून परत घेण्याच्या योजना आखाव्या लागतात; कर, कर्ज उभारणी, ह्यांचा अवलंब करून कांहींसें भागतें. चलनवाढीचा प्रश्न अर्थात स्वतंत्र आहे. येथें तूर्त आपल्या चलनीनोटाविषयीं विचार करावयाचा आहे. शंभर आणि दहा रुपयांच्या नोटांपैकीं कोणतीहि एक नोट आपल्यासमोर धरून, त्यावरील मजकूर आपण वाचूं या. प्रत्येकाजवळ शंभर रुपयाची नोट असणें शक्य नाहीं; दहा रुपयाची नोट त्याला मिळूं शकेल. म्हणून आपण सोईसाठी दहा रुपयांची नोट घेऊं या. एक रुपयाची नोट मात्र चालणार नाहीं; कारण तिला आपण नोट म्हणत असलों, तरी कायद्यानें तिला रुपयाच्या साध्या नाण्याचा दर्जा दिलेला आहे. चांदी किंवा निकेल मिश्रित धातूच्या तुकड्यावर जसा छाप मारून त्याचा रुपया करतात, तसेच कागदाच्या तुकड्यावर छाप मारून त्याचा रुपया बनविलेला आहे. चलनी नोटा काढण्यावर जीं बंधनें आहेत, तीं रुपयाच्या नोटा काढण्यावर नाहींत. रुपयाची नोट हें नाणें आहे, चलनी नोट नाहीं.

आतां आपण दहा रुपयाच्या नोटेची घडी उघडून तिची अशोक स्तंभाची बाजू तपासून पाहून या (१) "नोटेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया" असें वरती छापलेले आहे. म्हणजे, ही नोट रिझर्व्ह बँकेनें काढलेली आहे. प्रत्येक देशांत एक मध्यवर्ती बँक असते व तिला एकटीलाच नोटा काढण्याचा अधिकार असतो. भारतांतील मध्यवर्ती बँकेचें नांव रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया असें आहे व तिला एकटीलाच नोटा काढतां येतात; इतर कोणत्याहि बँकेस नोटा काढतां येत नाहींत.

"मध्यवर्ती सरकारनें हमी घेतलेली आहे" असा मजकूर नंतर छापलेला आढळतो. ह्याचा अर्थ, रिझर्व्ह बँकेचें नोटेची रुपयांत मोड देण्याचें जें वचन आहे, त्यास भारत सरकारची हमी आहे.

"ही नोट घेऊन येणाऱ्या इसमास, मागणी करतांक्षणींच १० रुपये देण्याचें मी वचन देतों" असा नंतर मजकूर असून त्याखाली रिझर्व्ह बँकेच्या वतीनें तिचे गव्हर्नर श्री. बी. रामराव ह्यांची सही आहे. म्हणजे, कोणीहि मनुष्य ही नोट रिझर्व्ह बँकेंत घेऊन गेला तर त्याला १० रुपये देण्यास बँक बांधलेली आहे.

पूर्वी भारतांत बहुंशीं रुपयाचें नाणें चांदीचें होतें. म्हणजे त्यांत ५०% चांदीचा अंश होता. ह्याचा अर्थ, दहा रुपयांच्या नोटेच्या बदली तितक्या किंमतीचे रुपये म्हणजेच जवळ जवळ निम्म्या किंमतीची शुद्ध चांदी मिळूं शकत असे. पुढें, ह्या चांदीच्या रुपयाची जागा १०० टक्के निकल असणाऱ्या रुपयानें घेतली. त्यांत चांदीचा बिलकुल अंश नाहीं. ह्या दोन्ही प्रकारांच्या रुपयांत कांहींतरी धातू तरी असतो, परंतु जुलै, १९४० पासून ह्या धातूचीहि आवश्यकता उरली नाहीं. भारत सरकार कागदावरहि रुपयाचा छाप उठवून त्याचे रुपये बनवूं लागलें. अशा कागदी रुपयांचा दर्जा चांदीच्या व निकेलच्या रुपायाच्या बरोबरीचा झाला आहे. रिझर्व्ह बँक १० रुपयांच्या नोटेची मोड म्हणून आतां प्रत्येक १ रुपया किंमतीचे १० कागदी रुपये देऊं शकेल. भारत सरकारच्या चलनी नोटांत रुपयाच्या नोटेचा समावेश का केलेला नाहीं, हें ह्यावरून ध्यानांत येईल. रुपयाची नोट ही चलनी नोट तर नाहींच; उलट ती चलनी नोटेस आधार असणारी जिंदगी झालेली आहे.!

---

### पोलादाचा कारखाना व बिहारची कैफियत

बिहार सरकारनें भारतीय सरकारला एक खलिता सादर करून नव्यानें काढण्यांत यावयाचा पोलादाचा कारखाना बिहारमध्यें सिंद्री येथें काढण्यांत यावा असें सुचविलें आहे. राज्य सरकारचें म्हणणें असें आहे कीं, बिहारमध्यें भारतांत सांपडणाऱ्या कोळशापैकीं ८० टक्के कोळसा सांपडतो. शिवाय पोलाद तयार करण्यासाठी ज्या कोळशाचें मिश्रण करावें लागतें तो तर बिहारमध्येंच सांपडतो. भूस्तर शास्त्रदृष्ट्या बिहारमधील खनिज लोखंड चांगल्या प्रकारचें असल्याचें प्रशस्तीपत्र मिळालेलें आहे. सिंद्री हें ठिकाण खाणींच्या प्रदेशाच्या मध्यभागींच वसलेलें असून त्या ठिकाणीं 'कोकिंग' कोळसाहि सांपडतो. इतर खनिजांचा विचार करतां शहाबाद, रांची, हजारीबाग आणि सिंगभूम ह्या ठिकाणीं चुनखडीचा दगड, डालमाइट आणि इतर जरूर तीं खनिजेंहि उपलब्ध आहेत. ह्या खनिजांची वहातूक करण्याचीहि चांगली व्यवस्था आहे. सिंद्री येथील खताच्या कारखान्यासाठीं जो रेल्वे रस्ता बांधण्यांत आला आहे त्याचा तर उपयोग होईलच. पण दामोदर खोरें योजनेप्रमाणें जे कालवे खोदण्यांत येतील त्यांचाहि वहातुकीसाठी उपयोग होईल. विजेचा पुरवठा व पाण्याचा पुरवठा बोकेरा व दामोदर धरणापासून होऊं शकेल. १९४५ सालीं मध्यवर्ती सरकारनें युद्धोत्तर कालासाठीं ज्या विकासयोजना आंखल्या होत्या त्यांत मोंघीर आणि मोकामे ह्यांच्या दरम्यानचा प्रदेशच औद्योगिक भाग म्हणून निवडण्यांत आला होता. बिहार हें राज्य 'अ' राज्यांपैकीं सर्वांत गरीब राज्य आहे. गेल्या १० वर्षांत राज्यांतील शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ७३ टक्क्यांवरून ८७ टक्क्यांवर गेली आहे. म्हणून ह्याच राज्यांत नवा कारखाना काढावा, असें राज्यसरकारचें म्हणणें आहे.

---

### चुकून भरलेली ३० लक्ष रु. जकात परत देण्याची मागणी

मध्यवर्ती सरकारच्या सॉलिसिटरनें मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनला नोटीस देऊन ३०,०६,८८४ रु. चा रिफंड मागितला आहे. १ जानेवारी, १९४८ ते १३ जुलै, १९४९ ह्या मुदतींत मध्यवर्ती सरकारनें परदेशांतून अन्नधान्य आयात केलें, त्यावर सरकारनें कॉर्पोरेशनला दिलेल्या जकातीची ही रकम आहे. सरकारच्या आयातीस जकात माफ आहे आणि ती जकात चुकून दिली गेली, तेव्हां ती परत मिळावी, अशी सरकारची मागणी आहे. १४ जुलै, १९४९ नंतरच्या काळासाठीं द. सा. द. शें. ६% व्याजहि सरकारनें मागितलें आहे. म्युनिसिपालिटीनें ही रकम दिली नाहीं, तर सरकार त्याच्या वसुलीसाठी मुंबई हायकोर्टांत दावा लावणार आहे.

## नवा लोखंडाचा कारखाना

### ओरिसांत का मध्यप्रदेशांत ?

भारत सरकारनें ७२ कोट रुपये खर्च करून पोलाद व लोखंड कारखाना काढावयाचें योजलें आहे. हा कारखाना बिहारमधील रूरकेला येथें काढावा कीं मध्यप्रदेशांतील भिलईला, हा वादग्रस्त प्रश्न आहे. वास्तविक १९४९ सालीं भिलईची जागा भारत सरकारनें निश्चित केली होती. परंतु गेल्या चार वर्षांपासून हितसंबंधी लोकांनीं केलेल्या कारवायांमुळें भारत सरकारच्या अधिकारी वर्गाच्या विचारांत बदल झाला आहे. त्यामुळें मध्यप्रदेशांतील भिलईपेक्षा बिहारमधील रूरकेल्याचें उत्पादन दरमणीं २० रुपयानें महाग पडणार आहे. उलट, भिलईला हा कारखाना झाल्यास ग्राहकांना ३५ रुपयांनीं स्वस्त लोखंड मिळणार आहे. हितसंबंधी लोकांच्या कारवायांना भारत सरकार बळी पडणार कीं काय, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

राष्ट्रहिताच्या प्रगल्भ दृष्टीनें लोखंडाचा कारखाना मध्यप्रदेशांतच निघणें फायदेशीर ठरणार आहे. भांडवली खर्च, कच्च्या मालाचा पुरवठा, वाहतूक, संरक्षण, उत्पादनाला येणारा खर्च, बाजारांचें पृथःकरण आणि पुरवठ्यासाठी नेहमीं पडणारा खर्च इत्यादी सर्वच बाबतींत हा कारखाना अन्यत्र काढणें किफायतशीर होणार नाहीं ही गोष्ट आतां आंकड्यांनिशीं सिद्ध झाली आहे.

मध्यप्रदेशांतील खनिज पदार्थांची पहाणी सुमारें २५ वर्षांपूर्वी झाली, त्यावेळीं रायपूर, दुर्ग, बस्तर या विभागांत लोखंड सांपडूं शकतें असें नमूद करण्यांत आलें होतें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा प्रश्न प्रामुख्यानें समोर आला. (१) कॉपर्स आणि कंपनी, पिट्सबर्ग, अमेरिका (२) ऑयर जी. मॅकी ॲण्ड कंपनी आणि (३) इंटर नॅशनल कंपनी लिमिटेड, लंडन या तीन कंपन्यांनीं १९४८ मध्यें पाहणी केली. याचे पूर्वी कॉपर आणि कंपनीनें आणि ऑयर्न ॲण्ड स्टील (मेजर) कंपनीनें १९४६ सालीं पहाणी केली होती या चौकशीचे अध्यक्ष सर पद्मजी जीनवाला हे होते.

### तज्ज्ञांचा सल्ला

१९४६ सालच्या या चौकशीसमितीनें छत्तिसगड विभागांत रायपूरच्या जवळपास हा कारखाना काढावा असें स्पष्ट मत दिलें होतें. यानंतर वरील तीन कन्सल्टिंग इंजिनियर्स समित्यांनीं पहाणी करून शिफारशी केल्या. यावेळीं सादर करण्यांत आलेल्या कांहीं महत्त्वाच्या बाबींकडे कन्सल्टिंग इंजिनियर्सचें लक्ष गेलें नाहीं. कॉपर कंपनीचे तज्ज्ञ ऑगस्ट १९४८ मध्यें आले होते व त्यांनीं ५ लक्ष टन लोखंड तयार करणारा एक कारखाना हिराकुंडला उघडा व दुसरा ५ लक्ष टनी कारखाना मध्यप्रदेशांत तंदूला येथें उघडा अशी शिफारस केली. यानंतर भिलईचें चांगलें स्थान उघडकीस आलें व त्यांनीं पुरवणी रिपोर्ट तयार करून भिलईला हा कारखाना उघडा अशी शिफारस केली.

मॅकी आणि कंपनीनें दोन लोखंडाचे कारखाने काढावयाचे असतील तर पहिला कारखाना मध्यप्रदेशांतच काढला पाहिजे असें सुचविलें होतें. इंटर नॅशनल कंन्स्ट्रक्शन कंपनीनें दोन कारखाने काढा अशी शिफारस केली होती. पैशाचे अभावीं पंचवार्षिक नियोजनाचे कच्च्या खर्ड्यांत लोखंडाच्या कारखान्याचा उल्लेख नव्हता. पण त्याची तरतद नोव्हेंबर १९५२ मध्यें करण्यांत आली.

### टेक्निकल कमिशनचा सांवळा गोंधळ

यानंतर टेक्निकल कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनच्या नेमणुकीची बातमीसुद्धां मध्यप्रदेश सरकारला देण्यांत आली नाहीं आणि नंतर हितसंबंधीयांचे घागेदोरे ओढले जावूं लागले. या टेक्निकल कमिशननें मध्यप्रदेशांत चौकशीसुद्धां केली नाहीं. नागपूरच्या धावत्या दौऱ्यांत या मिशनशीं मध्यप्रदेशाच्या प्रतिनिधींची जी चर्चा झाली त्यावरून मध्यप्रदेशातर्फे सादर केलेल्या माहितीवर त्यांनीं विचारच केला नव्हता असें दिसून आलें आणि चुकीच्या माहितीवर आधारभूत असलेला या समितीचा अहवाल तयार होऊन त्यावर केवळ सह्याच व्हावयाच्या शिल्लक होत्या.

### मध्यप्रदेशाची तक्रार

यानंतर मध्यप्रदेश सरकारनें भारत सरकारशीं व नियोजन समितीशीं पत्रव्यवहार केला आणि मध्यप्रदेशाचें म्हणणें ऐकून घ्या,अशी विनंति केली. ता. २३ एप्रिल १९५३ ला नियोजन समितींत मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री व इतर प्रतिनिधींनीं मध्यप्रदेशाची बाजू मांडली. या सभेंत कारखाना कोठें उभारावा या प्रश्नावर खुलें दिल आहे असें सांगण्यांत आलें व त्याचबरोबर मध्यप्रदेशांतील कोळसा हा कोकिंग कोल म्हणून उपयोगांत येईल कीं, नाहीं याची पाहणी करण्याचा आदेश देण्यांत आला. पण ही पाहणी भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनीं अद्याप केली नाहीं. वास्तविक प्रथम पाहणींत कोरबा येथें कोकिंग कोल आहे असें मत व्यक्त करण्यांत आलें होतें व हा अंदाज सत्य ठरला तर उत्पादनाची किंमत अधिक कमी होईल. पण कोळसा निर्यात करणाऱ्या परदेशी कंपन्यांना ही पाहणी कशी परवडणार ? त्यामुळेंच ही पाहणी मागें पडली आणि म्हणूनच मध्यप्रदेश सरकारकडून जाणारीं निवेदनें, पत्रें व मागण्या यांवर विचार होत नसावा अशी शंका माहितगार गोटांतून व्यक्त केली जात आहे.

### या सर्व सोयी पाहा

रायपर जिल्ह्यांत भिलई येथें हा कारखाना सुरू केला तर लगतच लोखंडाचे पर्वत आहेत, हें कच्चें लोखंड खाणींतून काढावें लागणार नसून जशी गिट्टी जमा करतो त्याप्रमाणें जमा करतां येईल.

लोखंडाचे हे पर्वत संपल्यानंतर लगेच एका बाजूला चुना व दुसऱ्या बाजूला कोळसा आणि त्यानंतर मँगनीज हा सर्व कच्चा माल एकाच टापूंत मध्यप्रदेशांत आहे. ह्या मालाचा पुरवठा करावा लागणार नसून नव्या कारखान्याला हा माल स्वतःसाठीं निरनिराळ्या खाणी सुरू करून मिळवितां येण्यासारखा आहे आणि यामुळेंच उत्पादनाची किंमतहि घटणार आहे. पण हितसंबंधी लोकांना हे सर्व पचनीं पडणारें नसल्यामुळें मध्य प्रदेशांत कोक नाहीं, कारखान्यासाठीं रेल्वे बांधावी लागेल, वगैरे सारखे दुय्यम प्रश्न निर्माण करून भिलईच्या मार्गांत अडथळे निर्माण केले जात आहेत.

("महाराष्ट्र", नागपूर)

---

**रेडिओच्या परवान्यांचें उत्पन्न**—भारत सरकारला रेडिओच्या परवाना-फीपासून दरवर्षी सुमारें ११५·५३ लक्ष रुपये उत्पन्न मिळतें. १९५२-५३ सालीं पोस्ट-खात्यानें एकूण ७,७७,२१० परवाने नवीन दिले अगर जुने पुन्हा चालू केले.

**स्वस्त घरांसाठीं दिलेलीं कर्जें**—मोठ्या शहरांतून औद्योगिक कामगारांना रहाण्यासाठीं जीं स्वस्त घरें बांधण्यांत येत आहेत त्यासाठीं भारतीय सरकारनें आतांपर्यंत १·३३ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत, असें समजतें.

## सहकार–गीत

( चाल–'बहु असोत सुंदर' या महाराष्ट्र गीताची )

भरत–भूमि ध्येय साध्य व्हावया भलें।
सहकाराधिष्ठित करूं राज्य आपुलें ॥ धृ. ॥
काढुनि पतपेढी तशी विविध कारिणी।
गरजूंना पुरवुं कर्ज योग्य कारणीं ॥
शेति–सुधाराई नि पाणिपुरवठा।
अन्नधान्य वाढे मग नांव ना घटा ॥
एकत्रित करूनि शेति पिकवुं चांगलें ॥ सहकारा ॥ १ ॥
काटकसर करूनि बनूं स्वावलंबनीं।
समतेचा एकोपा ठेवूं या मनीं ॥
सत्य सचोटीचा तो मार्ग चांगला।
एकमेक साह्य करूं अन्य ना भला ॥
उत्पादन वाढे पैदास चांगलें ॥ सहकारा ॥ २ ॥
नविन नविन प्रतिवर्षी होत कायदे।
सहकारी संस्थांना मिळत फायदे ॥
ध्यवतांना लागूं ते सूट पेढिना।
संघटना श्रेष्ठ असें पटविण्या जना ॥
आर्थिकहि साह्य तसें मिळत चांगलें ॥ सहकारा ॥ ३ ॥
गरिबांना साह्य करूं ग्राम उद्धरूं।
अज्ञाना सूज्ञ करूनि शाहणें करूं ॥
नष्ट करूं सावकारी ती दलालिही।
चोख काम चोख दाम सद्विचारही ॥
जीवन सहकारी असें बनवुं चांगलें ॥ सहकारा ॥ ४ ॥
दूर करूनि भेदभाव जागृति करूं।
बंधुभाव अंगि धरूनि देश उद्धरूं ॥
मानवता ठेवुं मनीं भवित भावना।
सहकारी तत्त्व श्रेष्ठ पुरवी कामना ॥
सहकारी संघ राज्य बनवूं चांगलें ॥ सहकारा ॥ ५ ॥

–कवि : कृ. मा. देशपांडे, एस. टी. सी.
को. ट्रे. इन्स्पेक्टर, पुणें.

---

### बँक ऑफ बरोडा लि.

बँक ऑफ बरोडा लि ला १९५३ मध्यें २४ लक्ष, ८३ हजार रु. नफा झाला. १०% करमाफ डिव्हिडंड भागीदारांना मिळेल.

---

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेकडे १९५३ अखेर ६५ कोटी रु. च्या ठेवी आहेत. म्हणजे, एका वर्षात ठेवींत ६ कोटींची भर पडली आहे. नफा वाटणीस ४१ लक्ष, ७९ हजार रुपये आले आहेत. १९५२ चे मानानें १९५३ सालीं नफा ५.७४ लाखांनीं वाढला आहे.

---

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला १९५३ मध्यें ७६.५१ लक्ष रु. नफा झाला. १९५२ मध्यें तो १ कोटि, ६१ हजार रु. होता. बँकेच्या करंट ठेवींत ४ कोटींची घट झाली, पण सर्व प्रकारच्या ठेवींची मिळून रक्कम कायम राहिली. म्हणजे, बँकेला ज्यास्त दरानें व्याज द्यावें लागलें. बँकेनें डिव्हिडंड २ रु. वरून १ रु. ८ आ. करण्याचें ठरविलें आहे.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबॅंक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठीं दिला जातो.

**भरपाई झालेलें भांडवल**

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फें | रु. ३३,९९,१५० | |
| मुंबई सरकारतर्फें | रु. २६,००,००० | |
| | रु. | ५९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५४,३३,९०० |
| ठेवी | रु. | ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,२९,०२,८०० |

## १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.